प्रहार

मुंबई ■ रविवार, १३ मे २०१८ ■ RNI Reg.No.: एमएएचएमआर/२००५/१८६८१ ■ वर्ष १४ ■ अंक २०८ ■ पाने १६ (कोलाजसह) ■ ₹ ४.००

# खानोलकर मंडळाचे 'भीष्म प्रतिज्ञा' नाटक प्रथम

■ विठ्ठलादेवी मंडळाचे 'गरुड झेप' द्वितीय, आरोलकर मंडळाचे 'वृंदा जलंधर' तृतीय

■ ४२ व्या दशावतारी नाट्यमहोत्सवाचा निकाल जाहीर

सिंधुदुर्ग ( प्रतिनिधी )

ओरोस रवळनाथ मंदिराच्या रंगमंचावर संपन्न झालेल्या कामगार कल्याण मंडळाच्या ४२ व्या नाट्यस्पर्धेत खानोलकर दशावतारी नाट्य मंडळ, खानोली यांनी सादर केलेल्या 'भीष्म प्रतिज्ञा' या नाटकाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. द्वितीय क्रमांक विठ्ठलादेवी दशावतारी नाट्य मंडळ, राठीवडे यांच्या गरुड झेप नाटकाने तर तृतीय क्रमांक आरोलकर दशावतारी नाट्य मंडळ, आरवलीच्या 'वृंदा जलंधर' या नाटकाने पटकाविला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने ओरोस येथील श्री देव रवळनाथ मंदिर येथील रंगमंचावर ४२वा दशावतारी नाट्यमहोत्सव २०१८-१९ ही स्पर्धा संपन्न झाली. १८ दशावतारी नाट्य मंडळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. दररोज एक नाटक सायंकाळी सादर केले जायचे. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. अशोक भाईडकर, सुधाकर वळंजू व मोहन मेस्त्री यांनी काम पाहिले. स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आले. पाच हजार, तीन हजार, दोन हजार असे प्रथम तीन क्रमांकांना तर दोन उत्तेजनार्थ नाट्य मंडळांना प्रत्येकी दीड हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

तसेच सर्वोत्कृष्ट राजा, सर्वोत्कृष्ट राणी, सर्वोत्कृष्ट खलनायक, सर्वोत्कृष्ट विनोदी, सर्वोत्कृष्ट नारद, सर्वोत्कृष्ट संगीत साथ यासाठीही प्रथम तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ ठेवण्यात आली आहेत. एक हजार, ८०० रुपये, ६०० रुपये असे प्रथम तीन क्रमांकांना व दोन उत्तेजनार्थ यांना प्रत्येकी ३०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. या स्पर्धेत प्रथम उत्तेजनार्थ श्री देव हेळेकर दशावतारी नाट्य मंडळ कारिवडे यांच्या मृत्युंजय नाटकाने तर उत्तेजनार्थ दुसरा क्रमांक श्री सिद्धेश्वर दशावतारी नाट्य मंडळ, दोडामार्ग यांच्या 'राजा हरिश्चंद्र तारामती' या नाटकाने पटकाविला आहे.

सर्वोत्कृष्ट राजा : प्रथम - लक्ष्मण नांदोसकर (भीष्म) खानोलकर खानोली, द्वितीय - केशव खांबल (राजा हरिश्चंद्र) सिद्धेश्वर दोडामार्ग, तृतीय - विघ्नराजेंद्र कोंडुरकर (राजा मित्रसह) वावळेश्वर तेंडोली, उत्तेजनार्थ प्रथम कृष्णा धुरी (जलंधर) आरोलकर आरोली, उत्तेजनार्थ द्वितीय - पुरुषोत्तम खेडेकर (कृष्ण) लिंगरामेश्वर ओवळीये. सर्वोत्कृष्ट राणी : प्रथम - हरी सावंत ( वृंदा ) आरोलकर आरोली, द्वितीय - सुधीर तांडेल (पिंगला) आनंदीअनंत बागवे अणाव, तृतीय - संतोष चाळके (विनिता) विठ्ठलादेवी राठीवडे, प्रथम उत्तेजनार्थ - विनोद परब (जयंती) गुरुकृपा हळवल. द्वितीय उत्तेजनार्थ - अब्दुल नदाफ (तारामती) सिद्धेश्वर दोडामार्ग.

सर्वोत्कृष्ट खलनायक : सुहास गावडे (कालांत) हेळेकर कारीवडे, सतीश केळुसकर (दुर्योधन) खानोलकर खानोली, बाबाजी मेस्त्री (शेषनाग) विठ्ठलादेवी राठीवडे, संतोष पांग्रडकर (नमुची असुर) स्वयंभू पांग्रड, कृष्णा गोसावी (भ्रमकासुर) गुरुकृपा हळवल यांनी अनुक्रमे प्रथम तीन व उत्तेजनार्थ क्रमांक मिळविले. सर्वोत्कृष्ट विनोदी : शंकर नरे (डोंबारीन) घोडेश्वर हुमरमळा, भालचंद्र भारमल (कोळी) हेळेकर कारीवडे, वैभव प्रभू (विजया) लिंगरामेश्वर ओवळीये, संदीप मेस्त्री (सेवक) आनंदी अनंत बागवे अणाव, सुहास माळकर (मडवळ) पराडकर फाऊंडेशन आडवली यांनी प्रथम तीन व दोन उत्तेजनार्थ क्रमांक मिळविले.

सर्वोत्कृष्ट नारद : प्रथम - नंदकुमार चव्हाण (लिंगरामेश्वर ओवळीये), द्वितीय - योगेश कोंडुरकर (वावळेश्वर तेंडोली), तृतीय - सुशांत वेंगुर्लेकर गौतमेश्वर दाभोली, प्रथम उत्तेजनार्थ - प्रथमेश मळगांवकर (हेळेकर कारीवडे), द्वितीय - मारुती मेस्त्री (ओमभवानी राठीवडे). सर्वोत्कृष्ट संगीत साथ : प्रथम - गुरुकृपा हळवल, द्वितीय - हेळेकर कारीवडे, तृतीय - खानोलकर खानोली, उत्तेजनार्थ प्रथम - आरोलकर आरवली, उत्तेजनार्थ द्वितीय - गणेश कडावल अशाप्रकारे नाट्य मंडळांनी यश मिळविले आहे.